पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

# 🤦‍♂️वेज रिवीजन आणि कर्मचारी संघटनेचे प्रताप !!!!!🤦‍♂️

मित्रांनो,

आपली पुढील १० वर्षांची आर्थिक पत ठरविणारा ONGC वेज रीवीजन हा आपल्यासाठी खुप महत्त्वाचा,जिव्हाळ्याचा आणि निर्णायक विषय ठरतो.

परंतु त्याचवेळी वेज रीवीजन च्या माध्यमातून आपल्याच एम्प्लॉईज चे सदैव नुकसान करण्याचा वसा १९९७, २००७ आणि त्यानंतर देखील निर्लज्जपणे २०१७ च्या वेज रिविजन मध्ये अविरतपणे जपणाऱ्या या कर्मचारी संघटनेचे प्रताप आपल्या समोर मांडण्याचा हा प्रयत्न.

२०१७ पासून देय असलेल्या या एम्प्लॉईज च्या हक्काच्या वेज रीवीजन मध्ये साधरण २०१७च्या सुरवाती पासून आपण हे ऐकत आलो की "आधी BPCL HPCL यांचे वेज रीवीजन झाल्यावर त्यांच्या आधारावर आपले वेज रीवीजन आपण अस्थपणेकडे प्रस्ताव ठेवूया!!"

१ नाही २ नाही तर तब्बल ४ वर्षांचा प्रदीर्घ विलंब आपल्या सर्व एम्प्लॉइज ना या करिता करावा लागला. त्यानंतर शेवटी आपल्याला दाखविलेला गाजर हा फोल ठरत असल्याचे लक्षात आल्यावर कर्मचारी संघटनेने आपल्याला आस्थापन विविध ALLOWANCES (भत्ते) आणि SHIFT ALLOWANCES देत नसल्याचे सांगत आणि त्याकरिता विविध प्लॅटफॉर्म, रीग आणि WORK CENTER वर व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मीटिंग घेऊन आपल्याला टाडा मेस्मा लागला तरी चालेल परंतु आपण ALLOWANCES शिवाय करारावर सही करणार नाही अशी बनावट भूमिका घेतली. कर्मचारी संघटनेचे पितळ तेव्हा उघडे पडले जेव्हा आपल्या सर्व एम्प्लॉइज चे नुकसान करणारे wage रिवीजन केवळ १ रात्रीत कोणाला न कळता या मंडळीनी गपचुप साइन केले. ज्यामध्ये आपल्या सर्व बंधू भगिनिंचे प्रचंड नुकसान झाले ते पुढीलप्रमाणे :

१) STAFF EMPLOYEE'S करिता केवळ १५ टक्के FITMENT घेत ते देखील सर्वांना न मिळता फक्त २०१७ पूर्वीच्या भरती झालेल्या एम्प्लॉइजना मिळणे ज्यामध्ये २०१७ नंतर च्या म्हणजेच २०१९,२०२०,२०२३ या सर्व बॅच चे अतोनात नुकसान झाले,अशी अन्यायकारक अट मान्य करण्यामागचे रहस्य आपल्याला कर्मचारी संघटनाच सांगू शकते.यावर जाऊन आपण वचनपूर्ती मध्ये पाहिले असेल की इंडियन ऑईल ला नव्याने रुजू होणाऱ्या एम्प्लॉइज ना FITMENT दिला नाही असे सांगणारी मान्यताप्राप्त युनियन ला इतर PSU मध्ये FITMENT मिळाल्याचा विसर का पडत आहे? की आस्थापनेची मर्जी राखण्यासाठी हा अट्टाहास???

पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

१९९७ व त्यानंतर २००७ साली झालेली घोडचूक ज्यामुळे आज आपल्या F आणि A विभागातील आपल्या एम्प्लॉइज चे अतोनात नुकसान झाले त्याचीच प्रथा कायम राखत कर्मचारी संघटनेने २०१७ च्या वेज रीवीजन मध्ये देखील २०१७ नंतर रुजू होणाऱ्या एम्प्लॉइजना केवळ १०.४५ टक्के FITMENT देणे म्हणजे त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणे होय.

२) allowances करिता गठित करण्यात येणारी कमिटी जी आज पर्यंत कधीच बनली नाही आणि आपल्याला ना मायनिंग भत्ते(ALLOWANCES) ना शिफ्ट भत्ते( ALLOWANCES) मिळाले.

३) जर सर्व आधीच २०१७ मध्ये ठरल्याप्रमाणे घ्यायचे होते तर मग इतकी वर्षे प्रतीक्षा का ??? ज्यामुळे घरांच्या किमती ज्या ४०-५० लाखांपासून होत्या त्या जवळ जवळ ५० लाखांपासून पुढे निघून गेल्या, आणि त्याच वेळी आपल्या एम्प्लॉइज ची मात्र LOAN REPAYING CAPCITY ४ वर्षांनी कमी झाली.

४) ४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षे नंतर देखील आपल्या एम्प्लॉइज च्या नशिबाला ALLOWANCES आणि शिफ्ट भत्यांशिवय असलेले LOAN CAPACITY कमी करणारे आणि केवळ १५ टक्क्यांवर बोळवण केलेले हे नुकसान दायक वेज रीवीजन पदरात पाडून घ्यावे लागलें.

या अशा एम्प्लॉइज विरोधी वेज रीविजन आपल्यावर लादणाऱ्या या महाभागांनी जागा दाखवण्याची हीच वेळ आहे मित्रांनो.

आपल्याला हीच कळकळीची विनंती की आपल्या अधिकारांची राख रांगोळी करणाऱ्याची की आपल्याला नवी दिशा देणाऱ्या नवीन उम्मेदीची साथ देणाऱ्या आणि बिकट परिस्थितीतही आपल्या मागे खंबीर उभे राहणाऱ्या पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन बरोबरच आपली साथ ठेवून पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन लाच भरघोस मतांनी विजयी करा ही विनंती!

निर्णय आपला आहे,आपले भवितव्य ठरवायचे आहे!!!!

**Vote & Support: - Petroleum Employees Union (W.O.U.)**



**Symbol of Trust: RIG**

# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन